नि.दि.दा.क्र.०७/२०१९

//१०// अनुसया वि. शासन

प्र वादी क्र ५ तर्फे सा.क्र. १(नि.क्र.१३७ )

**<u>उलटतपास वादीतर्फे श्री. डी ए साबने वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

१८ मोरेवाडी मध्ये पोष्ट ऑफिस नाही. पूर्वी मोरेवाडीमध्ये शाळा सुध्दा नव्हती अलिकडेच जिल्हा परिषदेची शाळा सुरु झालेली आहे . मी काहीही शिकलेली नाही. माझी सगळयात लहान बहिण शिउबाई ही कितवीपर्यंत शिकली आहे हे मला माहिती नाही. शिउबाई मोरेवाडीतील शाळेत प्रवेशीत झाली होती याची मला माहिती नाही. हे खरे की, मी हिन्दू मराठा आहे. शिउबाईची जन्मतारीख ०९/०५/१९६३ अशी शाळेच्या निर्गम उता-यावर आहे याची मला माहिती नाही. ती मोरेवाडीतच शाळा शिकली याची मला माहिती नाही. माझी बहीण शिउबाई शाळा शिकली नाही किंवा आमच्या गावात शाळाच नव्हती असे मी खोटे सांगते हे खरे नाही. मला आता दाखवलेला जिल्हा परिषद शाळा मोरेवाडी येथील निर्गम उतारा, त्यावरील सही व मजकूर, शिक्का हे मी शिकलेली नसल्यामुळे माहिती नाही.

**( उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.)**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दिनांक ०९/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदपूर